
# PRINTING AREA®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-81, Vol-04 October 2021



ISSN 2394-5303

Editor
Dr.Bapu G.Gholap

CamScanner

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

October 2021, Issue-81, Vol-04

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205


Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# PRINTING AREA®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-81, Vol-04 October 2021


ISSN 2394-5303


Editor

Dr.Bapu G.Gholap


CamScanner

26) "मराठवाड्यातील लिंग गुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास"
डॉ.घुगे एस.पी., शिवाजीनगर (गढी), ता.गेवराई जि.बीड ||94

27) अधुनातन जनसंचार माध्यम और हिन्दी
डॉ. संजीव कुमार विश्वकर्मा, लवकुशनगर ||96

28) भारतीय ज्योतिषशास्त्र एवं ग्रहों का मानव जीवन पर प्रभाव
डॉ. सत्येन्द्र नाथ तिवारी, सिकरीगंज, गोरखपुर ||99

29) ''रामरंग'' रचित बंदिशें और प्रसंगों का चित्रण : जैसे गागर में सागर
डॉ. मनीषा (दीक्षित) शर्मा, सूरत ||104

30) मालती जोशी का व्यक्तित्व एवं रचना संसार
डायमंड साहू, रायपुरडॉ., रमणी चंद्राकर (छ.ग.) ||107

31) मानव प्रवृत्ति के विकास में धर्म एंव शिक्षा के प्रतिमान (सम्यक अध्ययन)
डॉ. अनिल कुमार पाण्डेय, लखनऊ ||122

32) भारतीय भाषाओं के संरक्षण एवं संवर्धन की आवश्यकता
प्रतिमा, अल्मोड़ा ||116

33) COVID -19 संक्रमण एवं कैदियों की स्वास्थ्य सुरक्षा भारत सरकार के लिए....
DR. PRADEEP KUMAR SHARM, DR. PREETI TANNA TAUNK, ||119

34) ब्रह्माण्ड पुराण के विशेष संदर्भ में पौराणिक इतिहास लेखन परम्परा
गरिजेश त्रिपाठी, लखनऊ ||127

35) सरकारी तथा गैर सरकारी माध्यमिक स्तर विद्यालय के शिक्षकों के....
ममता, डा. विभा लक्ष्मी, मेरठ ||131

36) जनपद महराजगंज (उ.प्र.) में नहर सिंचित क्षेत्र का वितरण प्रतिरूप
डा. शेषमणि विश्वकर्मा, गोला गोकर्णनाथ–खीरी ||137

37) आपदा प्रबंधन में पुलिस की भूमिका
डॉ श्रीभगवान, मुरादाबाद उत्तरप्रदेश ||140

38) श्रीकृष्ण क्या अद्वैती हैं?
Nepal Das, Odisha ||145

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03

अध्यापन अभिरूचींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

वरिल उद्दिष्ट साध्य करण्याकरिता विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या अध्यापन अभिरूचींचा स्वतंत्र अभ्यास करण्यात आला. त्यानुसार अ श्रेणी मिळविणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या ०९ आहे तर विद्यार्थ्यांची संख्या १२ आहे. म्हणजेच विद्यार्थ्यापेक्षा विद्यार्थिनीं मध्ये उच्च अध्यापन अभिरूची कमी दिसून येते.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

१) इंग्रजी अध्यापन पद्धती असणाऱ्या शिक्षक प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यामध्ये विद्यार्थीनीपेक्षा अधिक अध्यापन अभिरूची असते.

२) उच्च अध्यापन अभिरूची असणारे प्रशिक्षणार्थी उत्तम शिक्षक होण्यास पात्र आहेत. मात्र अल्प अध्यापन अभिरूची असणाऱ्या प्रशिक्षणार्थींना आपली अभिरूची प्रयत्नांनी आणि प्रशिक्षणाद्वारे वाढवावी लागेल.

**सुचना व शिफारसी :**

**सुचना :**

१) अध्यापन अभिरूची वाढविण्याकरिता प्रशिक्षण महाविद्यालयात निरनिराळे उपक्रम राबविण्यात यावेत.

२) भाषिक अध्यापन अभिरूची वाढविण्याकरिता साहित्य, कथा, नाटके, महाकाव्य यावर आधारित अभ्यासपूरक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

३) शिक्षक प्रशिक्षणाचे क्षेत्र जागरूकपणे निवडावे. प्रवेश देण्यापूर्वी ही चाचणी विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावी.

**शिफारसी :**

१) अध्यापनाला आवश्यक अन्य निरनिराळ्या अभिरूचींचा अभ्यास करता येईल.

२) शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या अध्यापन अभिरूची व अध्यापन क्षमतांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.

**संदर्भ ग्रंथ :**

१) भांडारकर के.एम., १९९८, 'सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र', नुतन प्रकाशन, पुणे.

२) पारसनीस न.रा., 'शिक्षकांचे प्रशिक्षण', नूतन प्रकाशन, पुणे.

3) Kakkar Interest in Teaching Scale - KITS - Dr. S.B. Kakkar, National Psychological Corporation, AGRA, India.

4) Ghormade K.V. : 'Methodology of Teaching English' Vidya Prakashan Nagpur.

**26**

## "मराठवाड्यातील लिंग गुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास"

**डॉ. घुगे एस. पी.**
कला व विज्ञान महाविद्यालय
शिवाजीनगर (गढी), ता.गेवराई जि.बीड

**प्रस्तावना :-**

कोणत्याही प्रदेशाचा विकास हा तेथील लोकसंख्येवर आवलंबून आसतो कोणत्याही प्रदेशाचा विकास हा त्या प्रदेशातील लोकसंख्येच्या गुणवत्तेवर अवलंबून आसतो म्हणून आपणास लोकसंख्येचा संख्यात्मक व गुणात्मक अभ्यास करणे आवश्यक आसते. लोकसंख्येच्या रचनेमुळे मानवाच्या जिवशास्त्रीय सामाजिक व आर्थीक गुणवैशिष्ट्याची माहिति प्राप्त होते. कोणत्याही प्रदेशातील एकूण लोकसंख्येत स्त्री व पुरुषाचे प्रमाण कसे आहे. हे पाहणे म्हणजेच लिंग रचनेचा अभ्यास करणे गरजेचे आसते.

पुरुष व स्त्री यांचे प्रमाण नेहमी गुणोत्तराच्या स्वरुपात व्यक्त केले जाते त्यास लिंग गुणोत्तर असे म्हणतात. हे गुणोत्तराचे प्रमाण जगभर एकाच पध्दतीने वापरले जात नाही. भारत हे गुणोत्तर १००० पुरुषामागे असलेले स्त्रियांचे प्रमाण काढतात. भारत तसेच महाराष्ट्रात लिंग गुणोत्तर काढण्यासाठी खालील सुत्राचा वापर केला जातो.

**सुत्र :-** त्याच प्रदेशातील त्याच काळातील एकूण पुरुषाची संख्या सन २०११ च्या जनगननेनुसार समोर आलेल्या लिखीत उत्तराखंड सद्यस्थितीमध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे.स्त्रि पुरुष प्रमाण लक्षात घेऊन शोध निबंध लिहीला आहे.

**घ्येय व उदिष्टे :-**

१) मराठवाड्यातील ० ते ६ वयोगटातील प्रमाण इ.स.नुसार फरक अभ्यासने.

२) मराठवाड्यातील लिंगगुणोत्तरात उत्तम व मध्यम प्रमाणात जिल्ह्याचा आभ्यास करणे.

३) मराठवाड्यातील एकूण लोकसंख्येतील ० ते ६ वयोगटातील लिंग गुणोत्तराचे प्रमाण अभ्यासने.

**अभ्यास पध्दती :-**

प्रस्तूत शोध निबंध व सन २००१ ते २०११ या कालावधीतील



CamScanner

आसून शोध निबंधाच्या संशोधनासाठी दुय्यम सामग्रिचा वापर केला आहे. महाराष्ट्र राज्याचीं आर्थीक पाहणी अहवाल २००१ लोकराज्य २०११, व इतर दुय्यम सामग्रीचा अभ्यास करुन संशोधनाचा अहवाल तयार केला हे.

**अभ्यास क्षेत्र :-**

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा हा एक महसुल विभाग आहे. मराठवाड्याची जडण घडण इ.स. १८२९ पर्यंत होत होती. सन १८७० मध्ये हैद्राबाद, संस्थानाची पुर्नरचना केली त्यास औरंगाबाद विभाग निर्माण केला त्यास आज मराठवाडा या नावाने ओळखले जाते. यामध्ये औरंगाबाद, बीड, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, उस्मानाबाद, लातूर अशा आठ जिल्ह्याचा समावेश करण्यात आला.

मराठवाड्याच्या पुर्वेस आंध्रप्रदेशाची सिमा, पश्चिमेस अहमदनगर जिल्हा, आणि नाशीक जिल्हा आहे. दक्षिणेस सोलापूर उत्तरेस जळगाव, बुलढाणा, आकोला वाशिम जिल्ह्याची सिमा आहे. मराठवाड्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७०३७' उत्तर आणि २००३९' उत्तर अक्षवृत्त ते ७४०३३' इस्ट आणि ७८०२२' इस्ट रेखावृत्तीय विस्तार आहे. मराठ्वाड्याचा भौगोलीक विस्तार ६४८१३ कि.मी आसून त्यातील २१% महाराष्ट्र राज्यामध्ये आहे. मराठ्वाड्यातील तापमान २७.७ ते ३८.०८ से पर्यंत आहे. पर्जन्याचे प्रमाण ८२५ से.मी आहे.

सन २०११ नुसार मराठवाड्याची लोकसंख्या एकूण १८७३१८७२ एवढी आहे. मराठवाड्यामध्ये गोदावरी ही सर्वात महत्त्वाची नदी आसून मराठवाडा हा महाराष्ट्रातील एक दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. मराठवाड्यातील लोकसंख्या ७६०४ लाख एवढी आहे. यामध्ये शहरी भागातील मुर्लीची एकूण लोकसंख्या ८८० एवढी आहे तर ग्रामीण भागातील मुर्लीची लोकसंख्या ८८८ एवढी आहे.

**तक्ता न. १**

**जिल्हा निहाय लिंग गुणोत्तर प्रमाण (० ते ६ वयोगट)**

| | २००१ लिंगगुणोत्तराचे प्रमाण दर एक हजार मुलांमागे | | | लिंग गुणोत्तराचे प्रमाण दर एक हजार मुलांमागे - २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हे | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण |
| नांदेड | ९२९ | ९२७ | ९२९ | ९०३ | ८८२ | ८९७ |
| हिंगोली | ९२९ | ९१४ | ९२७ | ८६८ | ८६६ | ८६८ |
| परभणी | ९२९ | ९०८ | ९२३ | ८५९ | ८८३ | ८६६ |
| जालना | ९०२ | ९०९ | ९०३ | ८३९ | ८८३ | ८८७ |
| औरंगाबाद | ८९३ | ८८६ | ८९० | ८४४ | ८५४ | ८४८ |
| बीड | ८९३ | ८९५ | ८९४ | ७८९ | ८४८ | ८०१ |
| लातूर | ९२१ | ९०६ | ९१८ | ८७४ | ८६७ | ८७२ |
| उस्मानाबाद | ८९४ | ८९२ | ८९४ | ८५२ | ८५६ | ८५३ |
| एकूण | ९१६ | ९०८ | ९१३ | ८८० | ८८८ | ८८३ |

संदर्भ - माहिती व जनसंपर्क महासंचालननालय, महाराष्ट्र शासन लोकराज्य मंबई - ३२२००१

तक्ता न.१ वरुन असे निदर्शनास येते की, सन २००१ च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागातील १००० मुलामागे सर्वात कमी लिंगगुणोत्तरामध्ये औरंगाबाद व बीड जिल्हाचा क्रमांक लागतो. तर सन २०११ नुसार शहरी भागात लिंगगुणोत्तरामध्ये सर्वात कमी औरंगाबाद जिल्हा ओळखला जातो. (८८६)

सन २००१ नुसार १००० मुलांमागे ग्रामीण भागात एकूण (९१६) मुलाचे प्रमाणात तर शहरी भागात (९०८) मुलीचे प्रमाण आढळते. तर सन २०११ नुसार ग्रामीण भागात १००० मुलामागे (८८०) मुलीचे प्रमाण तर शहरी भागात १००० मुलामागे (८८८) प्रमाण आढळते. यावरुन असे निदर्शनास येते की, सन २००१ नुसार एकूण लिंगगुणोत्तरामध्ये (९१६) मुलीचे प्रमाण आहे व सन २०११ नुसार एकूण लिंगगुणोत्तरामध्ये (८८३) हे मुलीचे प्रमाण आहे. म्हणजे दहा वर्षात मुलीच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे.

सन २०११ च्या अहवालानुसार ० ते ६ वयोगटात उत्तम किंवा गुणोत्तरास दोन जिल्हाचा समावेश येतो १) नांदेड ग्रामीण (९०३) शहरी (८८२) २) जालना ग्रामीण (८३९) शहरी (८८३) तर मध्यमकमी लिंगगुणोत्तरामध्ये बीड (७८९) ग्रामीण, शहरी (८८३) तर मध्यमकमी लिंग गुणोत्तरामध्ये बीड (७८९) ग्रामीण, शहरी (८४८) या आकडेवारीवरुन लिंग गुणोत्तराचे प्रमाण लक्षात येते दर १००० मुलामागे ग्रामीण व शहरी भागात मुलीचे घटते प्रमाण दिसून येते.

**निष्कर्ष :-**

१) मुलांना वंशाचा दिवा मानला जात आसल्यामुळे मुलीचे प्रमाण कमी होत चालले आहे.

२) भारतीय संस्कृतीत पुरुष प्रधान संस्कृतीला मानाचे स्थान दिले जाते व मुलीला दुय्यम स्थान दिले जाते.

३) मुलीची संख्या वाढविण्यासाठी कायदा आमलात आनला जातो पण कडक स्वरुप निर्माण केले पाहिजे.

४) मुलीला दुय्यम स्थान आसल्यामुळे विधवा, अत्याचार ह्या गोष्टी वाढल्या जावून मुलीचे प्रमाण कमी होत चालले आहे.

**संदर्भ सुची :-**

१) डॉ.सुरेश फुले, (२००९-१०) "महाराष्ट्राचा भूगोल" - विद्याबुक पब्लिकेशन,औरंगपुरा, औरंगाबाद

२) प्रा. डोईफोडे एच.के/ के.सागर, - "महाराष्ट्र लोकसेवा आयोग", अनिरुध्द पब्लिकेशन हाऊस पुणे - ४११०३०.

३) ए.बी.सवदी, (२००७) "प्रायोगिक भूगोल," निराली प्रकाशन,४१०, शनिवार पेठ, पुणे -४११०३०.

४) ए.बी.कोळेकर, (२००३) "लोकसंख्या भूगोल", बुधवार पेठ, जोगेश्वरीमार्ग पुणे - ४११०३०.

५) भारताची जनगनना, (२००१) समीर पुनार विसवास : लोकाभिमुख Director of censes operations, महाराष्ट्र, मुंबई.

६) DES - महाराष्ट्राची आयोक पाहणी अहवाल (२००९-१०) अर्ज व सांख्याकीय संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई.



CamScanner